जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025
लोकमत

# राज्यघटना जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवा : कुलगुरू

**कोल्हापूर :** भारतीय राज्यघटना मौलिक असून ती जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवली पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'मीडिया स्प्रेक्टम'च्या 'संविधान अमृतमहोत्सव विशेषांका'च्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. उद्देश पाटील, सानिका भोरे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025
लोकमत

# डॉ. प्रल्हाद माने समूह समन्वयक

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी समूह समन्वयक आणि राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड झाली. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव शरद द्विवेदी यांनी त्यांना निवडीचे पत्र पाठविले. स्पर्धेच्या मूल्यमापनासाठी सहभागी विद्यापीठांचे आठ प्रादेशिक गटांत विभाजन करण्यात येते. आठ समूह समन्वयकांची नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार माने यांच्याकडे चार राज्यांतील एकूण सात विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या मूल्यमापनाची जबाबदारी सोपविली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025
तरुण भारत

# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी डॉ. माने समूह समन्वयक

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य



मंत्रालयामार्फत १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी समूह समन्वयक आणि राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड झाली आहे. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव शरद द्विवेदी यांनी त्यांना निवडीचे पत्र पाठवले आहे.

संसदीप कामकाजाची माहिती तरुणांना व्हावी आणि त्यांच्यात नेतृत्व विकास व्हावा, या हेतूने संसदीय कार्य मंत्रालयातर्फे राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा आयोजित करण्यात येते. स्पर्धेच्या मूल्यमापनासाठी सहभागी विद्यापीठांचे आठ प्रादेशिक गटांत विभाजन करण्यात येते. तेथे आठ समूह समन्वयकांची नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार डॉ. प्रल्हाद माने यांच्याकडे चार राज्यांतील सात विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या मूल्यमापनाची जबाबदारी सोपवली आहे.

यामध्ये मध्य प्रदेशातील इंदिरा गांधी राष्ट्रीय आदिवासी केंद्रीय विद्यापीठ, पाटणा (बिहार) येथील चाणक्य राष्ट्रीय विधी विद्यापीठ, गुजरातमधील बी. जे. वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) (वल्लभ विद्यानगर,आणंद), गोपीचंदजी महिला कला महाविद्यालय आणि गोपीचंदजी महिला वाणिज्य महाविद्यालय (सिओर), महाराष्ट्रातील मुंबई विद्यापीठ आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय (वर्धा) येथे डॉ. माने परीक्षक आणि समूह समन्वयक म्हणून भेट देऊन युवा संसद स्पर्धेचे मूल्यमापन करतील. डॉ. माने यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ संघाने स्पर्धेत दोन वेळा राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचून पारितोषिके पटकावली आहेत. डॉ. माने विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक आणि विद्यार्थी वसतिगृहाचे मुख्य अधीक्षक म्हणूनही काम पाहत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025
पुण्यनगरी

# समूह समन्वयकपदी डॉ. प्रल्हाद माने



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी समूह समन्वयक आणि राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड झाली आहे. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव शरद द्विवेदी यांनी त्यांना निवडीचे पत्र पाठवले आहे. यंदा स्पर्धेचे हे १७ वे वर्ष आहे. डॉ. प्रल्हाद माने यांच्याकडे चार राज्यांतील एकूण सात विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या मूल्यमापनाची जबाबदारी सोपवली आहे.

05 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज




# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी डॉ. प्रल्हाद माने समूह समन्वयक

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी समूह समन्वयक आणि राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड झाली आहे. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव शरद द्विवेदी यांनी त्यांना निवडीचे पत्र पाठविले आहे.



देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची मूल्ये रुजावीत, संसदीप कामकाजाची माहिती तरुणांना व्हावी आणि त्यांच्यात नेतृत्व विकास व्हावा, या हेतूने संसदीय कार्य मंत्रालयातर्फे राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा आयोजित करण्यात येते. यंदा स्पर्धेचे १७ वे वर्ष आहे.

स्पर्धेच्या मूल्यमापनासाठी सहभागी विद्यापीठांचे एकूण आठ प्रादेशिक गटांत विभाजन करण्यात येते. तेथे आठ समूह समन्वयकांची नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार डॉ. प्रल्हाद माने यांच्याकडे चार राज्यांतील एकूण सात विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या मूल्यमापनाची जबाबदारी सोपविली आहे. यामध्ये मध्य प्रदेशातील इंदिरा गांधी राष्ट्रीय आदिवासी केंद्रीय विद्यापीठ, पाटणा (बिहार) येथील चाणक्य राष्ट्रीय विधी विद्यापीठ, गुजरातमधील बी. जे. वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) (वल्लभ विद्यानगर, आणंद), गोपीचंदजी महिला कला महाविद्यालय (सिओर) आणि गोपीचंदजी महिला वाणिज्य महाविद्यालय (सिओर) तसेच महाराष्ट्रातील मुंबई विद्यापीठ आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय (वर्धा) या ठिकाणी डॉ. माने परीक्षक आणि समूह समन्वयक म्हणून भेट देऊन युवा संसद स्पर्धेचे मूल्यमापन करतील.

डॉ. माने यांनी १४ व्या, १५ व्या आणि १६ व्या युवा संसद स्पर्धेचे परीक्षक आणि समूह समन्वयक म्हणून संसदीय कार्य मंत्रालयामार्फत काम केले आहे. डॉ. माने यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ संघाने या स्पर्धेत दोन वेळा राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचून पारितोषिके पटकावली आहेत. डॉ. माने विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक आणि विद्यार्थी वसतिगृहाचे मुख्य अधीक्षक म्हणूनही काम पाहतात. विद्यापीठाच्या विविध समित्यांसह महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळामध्ये समाजशास्त्र अभ्यास समितीचे अध्यक्ष म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत.

05 FEB 2025

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात शिल्पकला कार्यशाळेला प्रतिसाद

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिल्पमहर्षी शिल्पकार स्व. बी.आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुणे येथील शिल्पसम्राट कला स्टुडिओ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या शिल्पकला कार्यशाळेत ४८ शिल्पकारांनी शिल्पाकृती तयार करून सादर केल्या. यश कुंभार याच्या शिल्पाकृतीने प्रथम क्रमांक पटकावले.

कार्यशाळेमध्ये सहावीच्या विद्यार्थ्यापासून ते ७० वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत व्यक्तींचा सहभाग नोंदवला. काहींनी तर प्रथमच हातात माती घेऊन तिला आकार दिला. सीमा खेडकर-शिर्के, संजीव संकपाळ या शिल्पकारांनी सहभागींना शिल्प कसे तयार करावयाचे याची प्रात्यक्षिके दाखविली.

बी.आर. खेडकर यांना आदरांजलीपर काही शिल्पे तयार करण्यात आली. भित्तीशिल्पे, मूर्ती, लाईव्ह मूर्ती, संकल्पशिल्पे अशा शिल्पाकृती कलाकारांनी तयार केल्या. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.



शिल्पकला कार्यशाळेत सहभागी कलाकार शिल्पाकृतीना आकार देताना.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025
लोकमत

# विद्यापीठात आज कार्निव्हलचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाचे आज बुधवारी (दि. ५) आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते दुपारी १२:३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येईल.

'कार्निव्हल-२०२५' हा विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा उत्सव विविध संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. महोत्सवात रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांतील पारंपरिक कलाकुसरीच्या वस्तूंचे प्रदर्शन होईल. स्नेहल शेट्ये, प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा, स्नेहा वझे आणि ऐश्वर्या चव्हाण या महोत्सवाचे संयोजन करीत आहे अशी माहिती विदेशी भाषा विभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025

पुढारी

# विद्यापीठात आज विदेशी कला, संस्कृती समर्पित 'कार्निव्हल-२०२५'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाचे बुधवार (दि. ५) रोजी आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दुपारी १२.३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. महोत्सवात रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांतील पारंपरिक कलाकुसरीच्या वस्तूंचे प्रदर्शन होईल. रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज संस्कृतीचा परिचय करून देणारी पुस्तके, शब्दकोश आणि बालसाहित्य देखील प्रदर्शित करण्यात येईल. स्नेहल शेट्ये, प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा, स्नेहा वझे आणि ऐश्वर्या चव्हाण या महोत्सवाचे संयोजन करीत आहेत. महोत्सवाला भेट देऊन विदेशी संस्कृतीचा परिचय करून घेण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025
सकाळ

# विद्यापीठात आज रंगणार 'कार्निव्हल'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाचे बुधवारी आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दुपारी साडेबारा वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येईल. 'कार्निव्हल-२०२५' हा विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा उत्सव विविध संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. महोत्सवात रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज भाषांच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांतील पारंपरिक कलाकुसरीच्या वस्तूंचे प्रदर्शन होईल. रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज संस्कृतीचा परिचय करून देणारी पुस्तके, शब्दकोश आणि बालसाहित्य देखील प्रदर्शित करण्यात येईल. या महोत्सवाला भेट देऊन विदेशी संस्कृतीचा परिचय करून घेण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
...जी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025
तरुण भारत

# विदेशी कला, संस्कृतीला समर्पित 'कार्निव्हल-२०२५'चे आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाचे आज (दि. ५)रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वि. स. खांडेकर भाषा भवन येथे महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येईल. महोत्सवात रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांतील पारंपारिक कलाकुसरीच्या वस्तूंचे प्रदर्शन होईल. रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज संस्कृतीचा परिचय करून देणारी पुस्तके, शब्दकोश आणि बालसाहित्य देखील प्रदर्शित करण्यात येईल. या महोत्सवाला भेट देऊन विदेशी संस्कृतीचा परिचय करून घ्यावा, असे आवाहन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

05 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# विदेशी कला, संस्कृतीला समर्पित 'कार्निव्हल-२०२५'चे उद्या आयोजन

**कोल्हापूर, (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाचे उद्या (दि. ५) आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते उद्या दुपारी १२.३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येईल.

'कार्निव्हल-२०२५' हा विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा उत्सव विविध संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. महोत्सवात रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या त्या-त्या देशांतील पारंपारिक कलाकुसरीच्या वस्तूंचे प्रदर्शन होईल. रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज संस्कृतीचा परिचय करून देणारी पुस्तके, शब्दकोश आणि बालसाहित्य देखील प्रदर्शित करण्यात येईल. स्नेहल शेट्ये, प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा, स्नेहा वझे आणि ऐश्वर्या चव्हाण या महोत्सवाचे संयोजन करीत आहेत. या महोत्सवाला भेट देऊन विदेशी संस्कृतीचा परिचय करून घेण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025

पुण्यनगरी



# सामाजिक शास्त्र संशोधन कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी आपले संशोधन जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी सोमवार, दि. ३ रोजी केले.

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक शास्त्रांतर्गत 'संशोधन पद्धतीशास्त्राचे सामाजिक शास्त्रातील महत्त्व' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनात गुणात्मक आणि संख्यात्मक संशोधनासाठीच्या पद्धतींविषयी सविस्तर विश्लेषण केले. त्यानंतर पहिल्या सत्रात डॉ. कविता वड्राळे यांनी संशोधनामधील नितीमत्ता, वाङ:मयचौर्य आणि संदर्भ पद्धती यावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. संतोष सुतार यांनी सामाजिक शास्त्रांसाठी सांख्यिकीय तंत्राविषयी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात डॉ. टी. व्ही. शर्मा यांनी सामाजिक संशोधनातील टप्पे विषद केले. समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यशाळेस डॉ. प्रकाश पवार, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. सुखदेव उंदरे यांच्यासह डॉ. नेहा वाडेकर, डॉ. मयुरेश पाटील, आकाश ब्राम्हणे, डॉ. दादा ननवरे, डॉ. दिग्विजय पाटील आदींसह विविध अधिविभागातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 FEB 2025

सकाळ

# संशोधन जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न करा : देशमुख

कोल्हापूर, ता. ४ : 'सामाजिक शास्त्रांतील संशोधकांनी आपले संशोधन जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रयत्न करावेत', असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले.

विद्यापीठातील सामाजिक शास्त्रांतर्गत 'संशोधन पद्धतीशास्त्राचे सामाजिक शास्त्रांतील महत्त्व' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनात गुणात्मक आणि संख्यात्मक संशोधनासाठीच्या पद्धतींविषयी सविस्तर विश्लेषण केले.